0 1 AUG 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वर्तमान समजून घेण्यासाठी इतिहास विषय महत्त्वाचा

## कुलगुरू डॉ. कामत : इतिहास अभ्यास मंडळातर्फे 'बी.ए. भाग-३'च्या १६ पुस्तकांचे प्रकाशन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळातर्फे 'बी. ए. भाग-३'च्या इतिहास अभ्यासक्रमातील १६ पुस्तकांचे शुक्रवारी प्रकाशन झाले. यावेळी कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रा. डॉ. चंद्रवर्धन नाईक, प्रा. डॉ. अवनीश पाटील आदी.

कोल्हापूर, ता. ३१ : इतिहास हा केवळ भूतकाळाचा अभ्यास नसून, वर्तमान समजून घेण्यासाठी आणि भविष्याची दिशा निश्चित करण्यासाठी महत्त्वाचा विषय आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळातर्फे बी.ए. भाग-३ च्या इतिहास अभ्यासक्रमासाठी तयार केलेली क्रमिक व दूरस्थ शिक्षणाच्या एकूण १६ पुस्तकांचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. कामत म्हणाले, 'नियमित तसेच दूरशिक्षणाच्या विद्यार्थ्यांना वेळेत दर्जेदार साहित्य मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे इतिहासाच्या पुस्तकांमध्ये संदर्भग्रंथ, क्यूआर कोड, संबंधित संकेतस्थळे आणि इतर डिजिटल साधनांचा समावेश करून विद्यार्थ्यांना मूळ माहितीपर्यंत पोहोचण्याची संधी द्यावी.' बी. ए. भाग-३ च्या सत्र ५ व ६ साठी स्थानिक इतिहास : संकल्पना आणि पद्धती, कोल्हापूरचा वारसा, आधुनिक जगाचा इतिहास, स्थानिक इतिहासाचे उपयोजन, मध्ययुगीन भारताचा इतिहास, प्राचीन भारताचा इतिहास, इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह, इतिहासलेखनाची तंत्रे आदी विषयांची एकूण ११ क्रमिक पुस्तके प्रकाशित करण्यात आली. तसेच इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह, इतिहासलेखनाची तंत्रे, प्राचीन भारताचा इतिहास, आधुनिक जगाचा इतिहास, मध्ययुगीन भारताचा इतिहास आणि मराठा साम्राज्याचा उदय व दृढीकरण विषयांचे दूरस्थ शिक्षणासाठी स्वयंअध्ययन साहित्य स्वरूपातील पाच पुस्तके प्रकाशित केली. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. चंद्रवर्धन नाईक, इतिहास अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. अवनीश पाटील, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, अभ्यास मंडळ विभागाच्या संध्या अडसुळे, उपकुलसचिव विनय शिंदे, दिलीप मोहाडीकर, दीपक काशीद उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 1 AUG 2026
सकाळ

# युवकांनी व्यसनांपासून दूर राहावे

## डॉ. कामत : 'नशामुक्त अभियान' स्पर्धांचे बक्षीस वितरण

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३१ : 'भारतामध्ये युवकांची संख्या सर्वाधिक असल्याने युवकांनी आपले आयुष्य विविध विधायक व सकारात्मक उपक्रमांमध्ये व्यतित करणे गरजेचे आहे. समाजातील सर्वच घटकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. परंतु, अशा समस्यांना घाबरून निराश न होता किंवा प्रलोभनांना बळी न पडता युवकांनी व्यसनांच्या आहारी जाऊ नये,' असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी केले.**




कोल्हापूर : माय भारत केंद्र व सायबर महाविद्यालय यांच्या वतीने झालेल्या 'मेरा युवा भारत'अंतर्गत 'नशामुक्त अभियान' विषयावर आधारित स्पर्धांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. व्यासपीठावर मान्यवर.

माय भारत केंद्र व सायबर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मेरा युवा भारत'अंतर्गत 'नशामुक्त अभियान' विषयावर आधारित विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरणप्रसंगी ते बोलत होते.

विभागीय सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव म्हणाले, 'नशा दोन प्रकारच्या असतात; परंतु युवकांनी अभ्यास, संस्कार, वाचन, मनन आणि चिंतन अशा चांगल्या गोष्टींची नशा केली पाहिजे; जेणेकरून ते आयुष्यात यशस्वी होऊ शकतील.'


दुपारच्या सत्रात कर्नल विक्रम नलवडे यांनी विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध आयुष्य जगण्यासाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले. या एकदिवसीय जिल्हास्तरीय कार्यक्रमात विविध महाविद्यालयांमधील सुमारे १६७ स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यामध्ये पथनाट्य, चित्रकला, गायन, काव्य, वादविवाद, नृत्य, रिल्स आणि घोषवाक्य या आठ प्रकारांमध्ये स्पर्धा झाल्या. कार्यक्रमाचे उद्‍घाटन सायबरचे संचालक डॉ. आर. के. टेलर, सायबर संचलित महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, समाजकार्य विभागाचे अधिष्ठाता डॉ. टी. व्ही. जी. शर्मा, प्रशासकीय अधिकारी डॉ. विनायक साळोखे, डॉ. दुर्गेश वळवी, डॉ. प्रीती गरगटे यांच्या उपस्थितीत झाले.

किर्लोस्कर कंपनीचे सामाजिक बांधिलकी अधिकारी शरद अजगेकर, सीपीआरचे वरिष्ठ समुपदेशक मकरंद चौधरी, लक्ष्मी फाउंडेशनचे अध्यक्ष विनायक देसाई व ए. आर. पी. कन्या कॉलेज (इचलकरंजी) येथील प्रा. प्रियांका साळोखे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. डॉ. दीपक भोसले यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पूनम माने यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. महेंद्र जनवाडे यांनी आभार मानले. माय भारत केंद्राचे जिल्हा समन्वयक स्वप्नील देशमुख, सहव्यवस्थापक गणेश भोसले, नीलेश कांबळे, डॉ. सुरेश आपटे, डॉ. कालिंदी रानभरे तसेच प्रा. शिवानी गावडे, प्रा. संध्या तळेकर, प्रा. वसीम सय्यद उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 1 AUG 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा पिढीने व्यसनांच्या आहारी जाऊ नये

## कुलगुरू : मेरा युवा भारत अंतर्गत आयोजित स्पर्धांतील विजेत्यांना बक्षीस वितरण




**जनप्रवास : कोल्हापूर**

विकसित भारतासाठी नशामुक्त युवा महत्त्वपूर्ण आहेत. भारतामध्ये युवकांची संख्या सगळ्यात जास्त असल्याकारणाने युवकांनी आपल्या आयुष्य विविध उपक्रमांमध्ये व्यतीत करणे गरजेचे आहे. विविध जाहिरातींच्या प्रलोभनांना बळी पडू नये, व्यसनांच्या आहारी जाऊ नये, असा सल्ला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी दिला. माय भारत केंद्र आणि सायबर महाविद्यालय कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मेरा युवा भारत अंतर्गत नशा मुक्त अभियानांतर्गत घेतलेल्या विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण प्रसंगी ते बोलत होते.

विभागीय सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी विचार मांडले. या एकदिवसीय जिल्हास्तरीय कार्यक्रमात जिल्ह्यातील विविध कॉलेजमधील सुमारे १६७ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. यामध्ये पथनाट्य, चित्रकला, गायन, काव्य, वादविवाद, नृत्य, रिल्स, घोषवाक्य इत्यादी आठ प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आली. यातील प्रत्येक स्पर्धेमधून तीन विजेत्यांना प्रशस्तीपत्रासह मानचिन्ह देऊन पाहुण्यांच्या हस्ते सत्कार केला. यातील प्रत्येक स्पर्धेतील विजेता हा राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवणार असून याची अंतिम फेरी राष्ट्रीय स्तरावर होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

सायबरचे संचालक डॉ. आर. के. टेलर, सायबर संचलित महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. टी. व्ही.जी शर्मा, डॉ. विनायक साळोखे, दुर्गेश वळवी, डॉ. प्रीती गरगटे यांच्या उपस्थितीत उद्घाटन पार पडले. दुपारच्या सत्रात कर्नल विक्रम नलवडे यांनी विचार मांडले. सूत्रसंचालन प्रा. पूनम माने यांनी तर प्रास्ताविक डॉ. दीपक भोसले यांनी केले. आभार प्रा. महेंद्र जनवाडे यांनी मानले.

कार्यक्रमास माय भारत केंद्राचे जिल्हा समन्वयक स्वप्निल देशमुख, सहव्यवस्थापक गणेश भोसले, नीलेश कांबळे, सुरेश आपटे, कालिंदी रानभारे यांचे सहकार्य लाभले तर परीक्षक म्हणून किर्लोस्कर कंपनीचे सामाजिक बांधिलकी अधिकारी शरद अजगेकर, सी. पी. आर हॉस्पिटलचे वरिष्ठ समुपदेशक मकरंद चौधरी, लक्ष्मी फाउंडेशनचे अध्यक्ष विनायक देसाई, प्रियांका साळोखे. ए. आर. पी कन्या कॉलेज इचलकरंजी यांनी काम पाहिले तर शिवानी गावडे, संध्या तळेकर, वसीम सय्यद, विद्यार्थी प्रतिनिधींचे सहकार्य लाभले.

01 AUG 2026
सकाळ

# अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त सोमवारी चर्चासत्र

कोल्हापूर : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन व इंग्रजी अधिविभागातर्फे अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (ता. ३) एकदिवसीय चर्चासत्र होत आहे. गणित अधिविभागात सकाळी साडे दहा वाजता त्यास सुरुवात होईल. 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका' विषयावर चर्चासत्र होईल. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस बीजभाषण करतील, तर डॉ. बळीराम गायकवाड यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‍घाटन होईल.

0 1 AUG 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात सांस्कृतिक अविष्कारातून गुरुवंदना

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुपौर्णिमेनिमित्त सांगितिक व सांस्कृतिक कलाविष्कारांतून विद्यार्थ्यांनी गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठ कल्चरल क्लब अंतर्गत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा सोहळा साजरा केला. या सोहळ्यात भरतनाट्यम नृत्यातून विद्यार्थ्यांनी 'श्लोकांजली" सादर केली. देवांग मराठे आणि प्रसाद सोनटक्के यांची बहारदार तबला जुगलबंदी रंगली. त्रिगुण पुजारी यांनी हार्मोनियम सोलो वादनाद्वारे राग मधुवंती सादर केला. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी सामुहिक हार्मोनिअम वादनाद्वारे राग मालकंस सादर केला. नाट्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी गुरु-शिष्याच्या नात्यावर आधारित हृदयस्पर्शी नाटिका तसेच व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेवर आधारित "झेल्या" ही लघुनाटिका सादर केली.अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी स्वागत केले. शिरीष कुलकर्णी व श्रुती खोचीकर यांनी सूत्रसंचालन केले. विक्रम परीट, संदेश गावंदे व ओंकार सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे संगीत संयोजन केले. मल्हार जोशी, विकास कांबळे यांनी तांत्रिक बाजू सांभाळली.

0 1 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

# शिवाजी विद्यापीठात सांस्कृतिक आविष्कारांतून गुरूंप्रती कृतज्ञता

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात गुरूपौर्णिमेनिमित्त विविध सांगितिक व सांस्कृतिक कलाविष्कारांतून विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठ कल्चरल क्लब अंतर्गत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा सोहळा अत्यंत मंगलमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा केला.


या सोहळ्यात भरतनाट्यम नृत्यातून विद्यार्थ्यांनी 'श्लोकांजली' सादर केली आणि आई-वडील, शिक्षक गुरुजनांवर आधारित कथ्थक नृत्यही प्रस्तुत केले. 'गणेश वंदना', 'हरी म्हणा गोविंद म्हणा' हे भक्तिगीत, जिवलगा कधी रे येशील तू, धुंदी कळ्यांना, निगाहें मिलाने को जी चाहता है, चन्दन सा बदन, इत्यादी हिंदी-मराठी गाणी तसेच राग यमनमधील बंदिशींचे सुरेल सादरीकरण केले. देवांग मराठे आणि प्रसाद सोनटक्के यांची बहारदार तबला जुगलबंदी रंगली. त्रिगुण पुजारी यांनी हार्मोनियम सोलो वादनाद्वारे राग मधुवंती सादर केला. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी सामुहिक हार्मोनिअम वादनाद्वारे राग मालकंस सादर केला. नाट्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी गुरु-शिष्याच्या नात्यावर आधारित हृदयस्पर्शी नाटिका तसेच व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेवर आधारित 'झेल्या' ही लघुनाटिका सादर केली. चित्रकलेच्या विद्यार्थ्यांनी विविध सांगीतिक वाद्यांच्या साथीसह सामूहिक पेंटिंगचे प्रात्यक्षिक दाखवून सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'गुरु कृतज्ञता सोहळा' पार पडला. विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचा सत्कार करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

0 1 AUG 2026 क्रांतीसिंह

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आधुनिक चुंबकीय ढवळणी यंत्र डिझाईनला पेटंट

कोल्हापूर (प्रतिनिधी):- येथील संशोधकांनी विकसित केलेल्या मॅग्नेटिक स्टिरर विथ पार्टिशन्ड ऑइल बाथ या आधुनिक चुंबकीय ढवळणी यंत्राच्या संरचनेला भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे. विविध शास्त्रीय अभिक्रियांसाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या या यंत्राचे डिझाईन तयार करण्यात राजाराम महाविद्यालयासह शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी योगदान दिले आहे. राजाराम महाविद्यालयातील डॉ. सूरज अशोक सोनवणे, अनिल पांडुरंग मराळे, डॉ. ओमप्रकाश बन्सीधर पवार आणि शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी येथील



मेकॅनिकल इंजिनियरिंगचे डॉ. हर्षवर्धन चंद्रकांत पंडित या अभिनव डिझाईनचे संशोधक आहेत. हे उपकरण रसायनशास्त्र, औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, अन्नप्रक्रिया तसेच विविध संशोधन प्रयोगशाळांमध्ये द्रव नमुन्यांचे एकाच वेळी सुरक्षित, अचूक आणि कार्यक्षम मिश्रण (डींळीळपस) तसेच तापमान नियंत्रण करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. विभागीय तैलस्नान (झरीींळींळेपशव जळश्र इरींह) या वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनेमुळे एकाच उपकरणात स्वतंत्र विभागांमध्ये एकाच वेळी विविध नमुन्यांवर प्रयोग करता येतात. त्यामुळे नमुन्यांमधील परस्पर परिणाम टाळले जातात, प्रयोगांची अचूकता वाढते आणि संशोधन अधिक सुरक्षित व परिणामकारक बनते.

या उपकरणाच्या आकर्षक, कार्यक्षम आणि आधुनिक औद्योगिक रचनेला डिझाईन पेटंट मंजूर झाल्यामुळे संशोधकांच्या या नाविन्यपूर्ण कार्याला राष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. या डिझाईन पेटंटमुळे भविष्यात संशोधन प्रयोगशाळांसाठी अधिक कार्यक्षम उपकरणांच्या निर्मितीस चालना मिळणार असून, उद्योग-शैक्षणिक सहकार्य, तंत्रज्ञान विकास आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनेलाही बळ मिळणार आहे. या संशोधनाबद्दल कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे तसेच स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर तसेच राजाराम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनिता बोडके यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

01 AUG 2026
पुढारी

# कलागुणांना बळ देणारे व्यासपीठ म्हणजेच युवा महोत्सव : डॉ. हुजरे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

युवा महोत्सव आणि 'इंद्रधनुष्य'सारखी व्यासपीठे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणार असल्याचे प्रतिपादन विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि विवेकानंद कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय एकदिवसीय युवा महोत्सव माहिती कार्यशाळा पार पडली. यावेळी ते बोलत होते. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. एस. जी. घाणे यांनी युवा महोत्सवाबद्दल माहिती दिली. डॉ. प्रमोद पाटील यांनी मार्गदर्शन केले. विविध कला प्रकारांवरील तज्ज्ञांनी मार्गदर्शन व प्रात्यक्षिके सादर केली. डॉ. आरिफ महात यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील व डॉ. मृणालिनी देसाई यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले.